मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी–चिंचवड
» गुरुवार, दि. 30 एप्रिल 2026 | पान- 1

# महापालिकेत राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची अचानक एन्ट्री

## त्या बैठकीनंतर 'वेगळ्या अजेंड्या'ची शहरभर चर्च.; राजकीय वर्तुळात सर्वत्र कुजबुज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत सोमवारी (दि. २७) राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अचानक भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. कोणताही अधिकृत किंवा पूर्वनियोजित दौरा नसताना त्यांनी महापालिकेत हजेरी लावल्याने प्रशासनासह पदाधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली.



या बैठकीदरम्यान शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. मात्र, बैठकीसाठी स्थानिक आमदार महेश लांडगे, शंकर जगताप हे बैठकीनंतर उशिराने सभागृहात दाखल झाले. त्यामुळे या भेटीची अचानकता अधिक ठळकपणे जाणवते.

राज्यमंत्री मिसाळ यांनी अधिकाऱ्यांकडून विविध प्रकल्पांची माहिती घेतली असली, तरी त्यांच्या या दौऱ्यामागे केवळ विकासकामांचा आढावा हा उद्देश होता की काही वेगळाच राजकीय अजेंडा होता, याबाबत शहरात चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः अलीकडील साठ कोटींच्या कथित घोटाळ्यामुळे भारतीय जनता पक्षाची शहरात होत असलेली बदनामी लक्षात घेता, त्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचा काही संदेश घेऊन आल्या होत्या का, अशीही कुजबुज महापालिका आवारात ऐकायला मिळत आहे.

या अचानक दौऱ्यामुळे स्थानिक राजकारणात नवे संकेत मिळत असल्याची चर्चा रंगली असून, पुढील काही दिवसांत याचे राजकीय परिणाम दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# जगताप डेअरी परिसरातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची धडक कारवाई

## परिसरातील 6 हजार 945 चौ. मी. अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या 33 पत्रा शेडवर धडक कारवाई करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जगताप डेअरी ते वाकड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर आज सकाळी १० वाजल्यापासून व्यापक कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाई दरम्यान परिसरातील ६ हजार ९४५ चौ. मी. अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या ३३ पत्रा शेडवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. या अनुषंगाने वाकड परिसरातील एकूण १०४ मालमत्तांची यादी तयार करण्यात आली होती. न्यायालयीन स्थगिती (स्टे) तसेच अटींसह स्थगिती (कंडिशनल स्टे) असलेल्या मालमत्ता वगळता उर्वरित सर्व अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली.



> पिंपरी-चिंचवड शहराचा शाश्वत आणि सुयोग्य विकास साधण्यासाठी अनधिकृत बांधकामांना आळा घालणे ही काळाची गरज आहे. प्रशासनाकडून कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल. नागरिकांनीही जबाबदारीची जाणीव ठेवून नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, अन्यथा अशा अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई अटळ आहे. ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सुरु असलेली सदर कारवाई उद्या देखील सुरु राहणार आहे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर ड क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी कारवाई वेळी मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घारगे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, किशोर ननवरे आणि पूजा दूधनाळे यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या कारवाईत बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विजयकुमार सोनवणे, ड क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य अभियंता सुनील शिंदे तसेच उप अभियंता संजय चव्हाण, संजय बंडगर, श्याम गर्गे, विनायक माने, संदीप वैद्य हे सहभागी झाले होते. या कारवाई दरम्यान महानगरपालिकेचे धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक असे १५० अधिकारी व कर्मचारी, १०४ पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ६० जवान उपस्थित होते. तर अतिक्रमण हटविण्यासाठी १६ जेसीबीचां वापर करण्यात आला. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशमन दलाची एक गाडी आणि दोन ॲम्बुलन्स घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. नागरिकांनी नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. असे देखील प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# महापालिकेच्या स्थायी समिती सभेत विविध विकासकामांना मंजुरी...

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर स्टॉर्म वॉटर लाईन, जलनिस्सारण व पायाभूत सुविधांना प्राधान्य; विविध कामांना हिरवा कंदील

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली.

यावेळी स्थायी समिती सदस्यांसह तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



**सभेमध्ये खालीलप्रमाणे विविध विषयांना देण्यात आली मंजुरी...**

कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर व्हीटीएम यंत्रणा बसविणे तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती करणे या कामास मंजुरी देण्यात आली. जुनी सांगवी परिसरातील रुग्णालयाच्या स्थापत्य दुरुस्ती व अनुषंगिक कामांस मान्यता देण्यात आली. भारत/महाराष्ट्र स्वच्छता अभियानांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात आरोग्य विभागामार्फत स्वच्छता मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक खर्चास मंजुरी देण्यात आली.

पुणे-बंगळुरू महामार्गाच्या पश्चिमेकडील वाकड, पुनावळे, ताथवडे व इतर भागांमध्ये पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती करणे, आवश्यकतेनुसार नवीन लाईन टाकणे व स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २९ पिंपळेगुरव येथील घाटावर स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र. २६ कस्पटे वस्ती, वेणूनगर, कावेरीनगर व इतर परिसरांमध्ये फुटपाथ, पेव्हिंग ब्लॉकची देखभाल व दुरुस्ती तसेच स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण येथील पडवळनगर व इतर परिसरांमध्ये पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २१ पिंपरी परिसरातील खचलेले ब्लॉक दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच प्रभाग क्र. २१ मधील फुटपाथ, पावसाळी गटर व इतर स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. १ मधील औद्योगिक परिसरातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सन २०२५-२६ साठी ताथवडे व पुनावळे परिसरात आवश्यक ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे, वॉल्व बसविणे तसेच अनुषंगिक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. मौजे ताथवडे जीवननगर येथील पाण्याच्या टाकीवरून पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन जलवाहिनी टाकण्यास मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या ताळेबंदपत्रकाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. क व ई क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत गांधीनगर, बालाजीनगर, संजय गांधीनगर व इतर झोपडपट्टी परिसरांमध्ये गटार करणे, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व स्थापत्य विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील आकुर्डी माध्यमिक विद्यालयातील एमएस-सीआयटी केंद्रासाठी फर्निचर खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सन २०२५-२६ साठी किवळे व रावेत येथील उंच पाण्याच्या टाकीच्या जलक्षेत्रात नव्याने विकसित होणाऱ्या भागांसाठी नवीन जलवाहिनी टाकणे व अनुषंगिक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली.

ह प्रभागातील सन २०२३-२४ साठी प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी परिसरातील देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २९ पिंपळेगुरव येथील वैदूवस्ती, सुदर्शननगर, जवळकरनगर व इतर परिसरांमध्ये जलनिस्सारण नलिका टाकणे व सुधारणा कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २६ पिंपळेनिलख येथील विशालनगर, कस्पटे वस्ती, वाकड आदी भागांमध्ये जलनिस्सारण नलिका टाकणे व सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र. ३१ नवी सांगवी येथील रामनगर व इतर परिसरांमध्ये जलनिस्सारण व्यवस्थेत आवश्यक सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच पिंपरी येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चासही स्थायी समितीने मंजुरी दिली.

### सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान...

» स्थायी समिती बैठकीदरम्यान माहे एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये कार्यकारी अभियंता सतिश वाघमारे आणि राजेंद्र मोराणकर यांचा समावेश होता. यावेळी त्यांच्या सेवाकाळातील उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली तसेच पुढील आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

> पिंपरी चिंचवड शहराचा वेगाने होत असलेला विस्तार लक्षात घेऊन पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. आजच्या स्थायी समिती सभेत स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, जलनिस्सारण, आरोग्य व शिक्षण या सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांतील कामांना मंजुरी देण्यात आली आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईनच्या कामांना गती देण्यावर भर देण्यात आला आहे.
>
> - अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पवना धरणातून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग; पाणीपातळी अचानक बदलण्याची शक्यता

## रावेत परिसरात सतर्कतेचा इशारा, सिंचन विमोचकाद्वारे 400 क्युसेक क्षमतेने नदीपात्रात विसर्ग केला जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड परिसरासाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. पवना धरणातून आज (दि. २९) रोजी पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती पवना धरण शाखेकडून देण्यात आली.



उपविभागीय अधिकारी, पवना उपविभाग यांच्या सूचनेनुसार सिंचन विमोचकाद्वारे ४०० क्युसेक क्षमतेने नदीपात्रात विसर्ग केला जाणार आहे. तसेच रावेत येथील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी दुपारी २ वाजता जलविद्युत केंद्रातून न्यूनतम १००० क्युसेक क्षमतेने सुमारे ८ MCFT अतिरिक्त पाणी सोडण्यात येणार आहे.

या एकत्रित विसर्गामुळे रावेत परिसरातील नदीपातळी अचानक कमी किंवा वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे व सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पिंपरी-चिंचवड परिसरासाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. पवना धरणातून आज (दि. २९) रोजी पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती पवना धरण शाखेकडून देण्यात आली.उपविभागीय अधिकारी, पवना उपविभाग यांच्या सूचनेनुसार सिंचन विमोचकाद्वारे ४०० क्युसेक क्षमतेने नदीपात्रात विसर्ग केला जाणार आहे.

# सवलतीच्या दरात भरता येणार मिळकतकर, प्रशासनाची घोषणा

## नव्याने तयार झालेल्या मिळकतींना महापालिका कर लावते या कराच्या माध्यमातून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा होतो.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून मिळकतकराची देयके तयार करण्यात आली आहे. मिळकतकराच्या बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. मे महिन्यांपर्यंत मिळकतकर भरणाऱ्यांना दर वर्षीप्रमाणे सवलत मिळणार आहे. नागरिकांना दिलेल्या मुदतीत मिळकतकर भरता यावा, यासाठी विविध पर्यायदेखील महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पुणे महानगरपालिकेचा उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून मिळकतकर विभागाकडे पाहिले जाते. सर्वाधिक उत्पन्न जमा करणारा विभाग म्हणून मिळकत कर विभाग आणि बांधकाम विभाग पुढे असतो. गेल्या काही वर्षात पुणे शहराचा विस्तार चारही दिशांना मोठ्या प्रमाणात होत असल्याने नवीन नवीन गृह प्रकल्प शहरात उभे राहत आहेत. नव्याने तयार झालेल्या मिळकतींना महापालिका कर लावते या कराच्या माध्यमातून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल महापालिकेचा तिजोरीत जमा होतो.




### सवलत व भरणा सुविधा उपलब्ध

**» नागरिकांनी वेळेत कर भरावा यासाठी ३१ मे २०२६ पर्यंत पाच ते दहा टक्के सवलत देण्यात आली आहे. मिळकतकर भरण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र, आयसीआयसीआय बँक आणि कॉसमॉस बँकेच्या शाखांमध्ये सुविधा उपलब्ध आहेत. तसेच महापालिकेची नागरी सुविधा केंद्रे सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सुरू राहणार आहेत. गर्दी टाळण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीचा वापर करावा, असे आवाहन उपायुक्त रवी पवार यांनी केले आहे.**

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या नवीन गावांमुळे पालिकेचे उत्पन्न अधिक वाढणार आहे. या गावांकडून मिळकत कर घेण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली होती. मात्र हा कर अधिक असल्याने त्यामध्ये सवलत द्यावी अशी मागणी समाविष्ट गावातील नागरिकांकडून केली जात आहे. ही मागणी लक्षात घेऊन राज्य सरकारने या गावातील नागरिकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या मिळकत कराला स्थगिती दिली आहे. परिणामी महापालिकेचे उत्पन्न घटत असल्याचे समोर आले आहे.

समाविष्ट गावातील मिळकत कराला दिलेली स्थगिती उठवावी यासाठी महापालिकेच्या वतीने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला जात आहे. परंतु त्यामध्ये अद्यापही महापालिका प्रशासनाला यश आलेले नाही. समाविष्ट गावातील मिळकत करावा राज्य सरकारने स्थिती दिली असली तरी अनेक नागरिक स्वतःहून महापालिकेचा मिळकत कर भरत असल्याचे दिसून आले आहे. मागील वर्षी ५०० कोटींपेक्षा अधिक भरणा या समाविष्ट गावातून नागरिकांनी केला आहे.

महापालिकेच्या मिळकतकर विभागाने चालू २०२६-२७ वर्षाची मिळकतकराची देयके तयार केली आहेत. ही देयके टपाल कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहेत. नागरिकांनी वेळेत कर भरावा, यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदादेखील पाच ते दहा टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. ३१ मे २०२६ पर्यंत ही सवलत असणार आहे. नागरिकांना कर भरता यावा, यासाठी विविध सुविधा पर्याय महापालिकेने उपलब्ध करून दिले आहे.

### मिळकतकर बिलांचे वितरण सुरू

**» पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मिळकतकराची देयके तयार करण्यात आली आहेत. ही बिले टपालाद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवण्यास सुरुवात झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मे महिन्यापर्यंत कर भरणाऱ्या नागरिकांना सवलत देण्यात येणार आहे. वेळेत कर भरण्यासाठी महापालिकेकडून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याने त्याच्या वसुलीकडे विशेष लक्ष दिले जात आहे.**

### समाविष्ट गावांतील करावर स्थगिती

**»महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या नवीन गावांकडून मिळकतकर वसुलीला सुरुवात करण्यात आली होती. मात्र कराचे प्रमाण जास्त असल्याने नागरिकांनी सवलतीची मागणी केली. यानुसार राज्य सरकारने या करावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात घट झाली आहे. तरीही अनेक नागरिक स्वेच्छेने कर भरत असून मागील वर्षी या गावांतून ५०० कोटींपेक्षा अधिक महसूल जमा झाला आहे. स्थगिती उठवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.**

---

# मेट्रोने हिंजवडी आयटी पार्कमधून थेट पुण्यात लवकरच प्रवास

## 'पीएमआरडीए'च्या अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांनी विविध ठिकाणांना भेटी देऊन प्रत्यक्ष कामाचा आढावा घेतला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांचा प्रवास सुखकर करणाऱ्या आणि हिंजवडी आयटी पार्कला शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या माण-हिंजवडी-शिवाजीनगर या 'मेट्रो मार्ग-३' प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी 'पीएमआरडीए' प्रशासन आता 'ॲक्शन मोड'मध्ये आले आहे. या प्रकल्पातील तांत्रिक अडथळे दूर करून काम वेळेत पूर्ण करण्याच्या उद्देशाने 'पीएमआरडीए'च्या अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांनी मंगळवारी विविध ठिकाणांना भेटी देऊन प्रत्यक्ष कामाचा आढावा घेतला.



'पीएमआरडीए' द्वारे सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाच्या 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' (पीआयसीटीएमआरएल) सोबत हा प्रकल्प राबविला जात आहे. मंगळवारी झालेल्या या पाहणी दौऱ्यात कामाची गुणवत्ता आणि प्रगतीवर विशेष भर देण्यात आला. पाहणीदरम्यान विद्यापीठ चौकातील पाषाण रॅम्पजवळ महापालिकेच्या जलवाहिनीतून मोठी पाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आले. या गळतीमुळे मेट्रोच्या कामात अडथळा येत असल्याने अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना ही गळती तातडीने थांबविण्याच्या सूचना दिल्या.

केवळ वेगच नव्हे, तर कामाची गुणवत्ताही आंतरराष्ट्रीय दर्जाची असावी, असे निर्देश के. मंजुलक्ष्मी यांनी दिले. या पाहणी दौऱ्यात पीएमआरडीएचे अधीक्षक अभियंता योगेश कुलकर्णी, कार्यकारी अभियंता उमेश मल्लावत, कनिष्ठ अभियंता सुमीत यादव, गजानन पाटील यांच्यासह पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि अभियंते उपस्थित होते.

### अशी आहे मेट्रो...

**» हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. माण डेपो ते पीएमआर-४ स्टेशन दरम्यान पहिली चाचणी गेल्या वर्षी जुलै महिन्यात यशस्वीरीत्या पार पडली. या मार्गावर एकूण २३ स्थानके असून शहरातून हिंजवडीला कामासाठी जाणाऱ्या नागरिकांचा मोठा वेळ वाचणार आहे. हा मार्ग भारतातील पहिला सार्वजनिक-खासगी भागीदारीत ( पीपीपी) उभारला जाणारा मेट्रो प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे काम २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरू झाले होते. आतापर्यंत प्रकल्पासाठी चार मेट्रो रेलगाड्या उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्येक गाडीत सुमारे एक हजार प्रवासी प्रवास करू शकणार असून ८० किमी प्रतितास या वेगाने गाड्या धावणार आहेत.**

# पुणे जिल्ह्यात डोंगर तोडफोडीमुळे दरडीचा धोका

## भोर, मावळ, मुळशी भागांत बेकायदेशीर उत्खनन वाढले; माळीणसारखी दुर्घटना टाळण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये बेकायदेशीर बांधकामांसाठी डोंगरांची मोठ्या प्रमाणावर तोडफोड होत असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषतः भोर, राजगड, मावळ आणि मुळशी तालुक्यांतील काही भागांमध्ये टेकड्यांचे उत्खनन करून प्लॉटिंग व रस्ते निर्माण करण्याचे प्रकार वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे

तज्ज्ञांच्या मते, डोंगरांची अशास्त्रीय पद्धतीने तोडफोड केल्यामुळे मातीची धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. उत्खननामुळे डोंगर भुसभुशीत होऊन मुसळधार पावसात माती, दगड व खडक खाली घसरू शकतात. काही ठिकाणी डोंगरांमध्ये चर खोदून पावसाचे पाणी रस्त्यांकडे वळवले जात असल्याचेही आढळते, ज्यामुळे धोका अधिक वाढतो. स्थानिक नागरिकांनी बेकायदेशीर उत्खननावर तातडीने नियंत्रण आणण्याची मागणी केली आहे.



### पुणे जिल्ह्यात उपाययोजनांची गरज वाढली

» पुणे जिल्ह्यातील या घडामोडींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी संवेदनशील भागांची पाहणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. माळीणसारख्या दुर्घटना टाळण्यासाठी दरडप्रवण भागात तातडीने उपाययोजना आणि पुनर्वसनाची गरज अधोरेखित केली जात आहे.

पुणे जिल्ह्यातील या घडामोडींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी संवेदनशील भागांची पाहणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी संवेदनशील भागांची पाहणी करून आवश्यक ती प्रतिबंधात्मक पावले उचलावीत, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून याप्रकरणी उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगितले जात आहे. तथापि, प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत प्रभावी ठरते, याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. मावळ तालुक्यात लोहगड परिसरात तसेच भोर-मांढरदेवी घाटात अलीकडेच दरडी कोसळल्याच्या घटना समोर आल्या होत्या. तसेच लवासा परिसरातही मुसळधार पावसा दरम्यान दरडी कोसळल्याने पर्यटक अडकण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. सुदैवाने या घटनांमध्ये मोठी जीवितहानी टळली असली तरी संभाव्य धोका कायम आहे.

यापूर्वी आंबेगाव तालुक्यातील माळीण येथील दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली होती. त्या पार्श्वभूमीवर दरडप्रवण क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन आवश्यक असल्याचे वारंवार अधोरेखित करण्यात आले आहे. मात्र, काही प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याची माहिती आहे. दरडप्रवण ठिकाणी वेळीच उपाययोजन करून जिल्ह्यात पुन्हा माळीण होण्यापासून वाचवावे, असे नागरिकांत चर्चा आहे.

### भोर–राजगडमध्ये डोंगरांची तोडफोड

» भोर आणि राजगड तालुक्यांमध्ये बेकायदेशीर बांधकामांसाठी डोंगरांची मोठ्या प्रमाणावर तोडफोड होत आहे. टेकड्यांचे उत्खनन करून प्लॉटिंग व रस्ते तयार केले जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे नैसर्गिक समतोल बिघडत असून पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. स्थानिक नागरिकांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### मावळ–मुळशीमध्ये दरडींचा धोका

» मावळ आणि मुळशी तालुक्यांमध्येही अशाच प्रकारे डोंगर उत्खनन वाढले आहे. तज्ज्ञांच्या मते, अशास्त्रीय पद्धतीमुळे मातीची पकड कमी होते आणि पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो. काही ठिकाणी पावसाचे पाणी वळवण्यासाठी चर खोदले जात असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

# रिकाम्या पीएमपीएमएल बस तासन्तास सुरुच, प्रवाशांच्या सुरक्षेसह इंधनाची नासाडी...

## शेवटच्या थांब्यावर तासनतास पीएमपीएमल बसचे इंजिन सुरुच; डेक्कनमधील घटनेनंतरही आगारांमध्ये पहिले पाढे पंचावन्न

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचा (पीएमपीएमएल) अजब कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शहरातील विविध मार्गांवर धावणाऱ्या पीएमपीएमएल बस शेवटच्या थांब्यावर तासनतास सुरूच ठेवल्या जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यामुळे केवळ सीएनजी इंधनाची नासाडी होत नसून, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

पीएमपीएमएलच्या ताफ्यातील बस पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीतील ३८८ मार्गांवर सेवा देतात.



दररोज सुमारे १० लाखांहून अधिक प्रवासी या बसने प्रवास करतात. नियमानुसार, प्रत्येक फेरी पूर्ण झाल्यावर चालक आणि वाहकांना २५ ते ४५ मिनिटांचा विश्रांतीचा वेळ दिला जातो. मात्र, 'एकदा सीएनजी बस बंद केली की पुन्हा सुरू व्हायला त्रास होतो,' या अजब कारणास्तव अनेक चालक बसचे इंजिन बंद न करताच विश्रांतीसाठी बाहेर जातात. तासनतास रिकाम्या बस सुरू राहिल्याने दररोज शेकडो किलो सीएनजी इंधनाची विनाकारण नासाडी होत आहे.

बस सुरू ठेवून चालक-वाहक अल्पोपहार किंवा जेवणासाठी बाहेर गेल्यावर बसमध्ये कोणीही नसते. अशा परिस्थितीत बस पळवण्याच्या किंवा अपघाताच्या घटना घडण्याची दाट शक्यता असते. विशेष म्हणजे, पुण्यात यापूर्वी दोन वेळा बस पळवण्याच्या घटना घडल्या आहेत, ज्यामध्ये निष्पाप नागरिकांचे बळी गेले होते. डेक्कन परिसरात नुकतीच एक बस माथेफिरूने पळवल्याची ताजी घटना घडूनही प्रशासन अजूनही ढिम्म असल्याचे चित्र आहे.

### दिवसाला शेकडो किलो सीएनजीची

» पीएमपीएमएलच्या सीएनजीवरील खर्चात दिवसेंदिवस वाढ झाली आहे. सध्या महिन्याला सुमारे २० कोटी रुपये आणि वर्षाला २२८ कोटी रुपये खर्च सीएनजीवर होत आहे. संचलन तुटीत वाढ होत आहे म्हणून तिकीट दरवाढ केली. पण, दुसरीकडे प्रवासी बसमध्ये नसतानाही बस सुरु ठेवल्यामुळे दिवसाला शेकडो किलो सीएनजीची नासाडी होते. याकडे मात्र प्रशासनाचे दूर्लक्ष झाले आहे.